**<u>ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मंजूरी देण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१२२/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १५ मे, २०१०**

वाचा : १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०

**<u>प्रस्तावना</u> :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा नळ योजनांसाठी रू. २.५० कोटी ते रू. ५.०० कोटी पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मुख्य अभियंता, भारत निर्माण कक्ष (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कक्ष) यांना देण्यात आलेले आहेत. सध्या मुख्य अभियंता, भारत निर्माण कक्ष (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कक्ष) हे पद रिक्त असल्याने वरील मर्यादेतील योजनांना तांत्रिक मंजूरी देण्यासाठी सक्षम प्राधिकारी उपलब्ध नाही. त्यामुळे येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन या संदर्भात सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

प्रस्तावनेत नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा नळ योजनांसाठी रू. २.५० कोटी ते रू. ५.०० कोटी पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

प्रादेशिक मुख्य अभियंता यांनी संबंधित योजनांना तांत्रिक मान्यता देण्यासाठी कोणतेही तांत्रिक शुल्क आकारू नये.

हे आदेश मुख्य अभियंता, भारत निर्माण कक्ष (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कक्ष) या पदावर रितसर नियुक्ती होईपर्यंत अंमलात असतील. त्यानंतर तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही यापूर्वी निर्गमित केलेल्या स्थायी आदेशानुसार करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१००५१९१८०७३८००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**(डॉ. निपूण विनायक)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७